-: प्रेसनोट दिनांक ०९/०१/२०२२ :-

**प्रसेनजीत बबनराव प्रधान, वय ४०, प्रांताधिकारी, सध्या नेम. राधानगरी-कागल उपविभागीय कार्यालय, कोल्हापूर, सध्या रा. फ्लॅट नं. ३०३, सी विंग, विण्डगेटस् अपार्टमेंट, न्यु पॅलेसजवळ, कोल्हापूर, मुळ रा. घर नं. ४५०, मित्रनगर, नवघन कॉलेजरोड, बीड शहर, ता. जि. बीड व संदीप डवर, वय ४०, सरपंच - फराळे ग्रामपंचायत, ता. राधानगरी, रा. लिंगाचीवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर यांनी संगनमताने लाचेची मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार यांचा लिंगाचीवाडी, ता. राधानगरी येथे क्रशर व्यवसाय असुन सदरचा व्यवसाय बंद करणेबाबत त्यांना ग्रामपंचायत फराळे व राधानगरी-कागल उपविभागीय कार्यालय, कोल्हापूर यांचेकडुन नोटीस पाठविणेत आल्या होत्या. सदरचा व्यवसाय सर्व शासकीय नियमासह, रितसर परवानगीने चालु असल्याने तक्रारदार यांनी प्रांताधिकारी प्रसेनजीत प्रधान, राधानगरी-कागल उपविभाग यांना भेटुन रितसर कागदपत्रे दाखविली असता, त्यांनी फराळे गावचे सरपंच संदीप डवर यांची भेट घेण्यास सांगितले. थोडयादिवसानी सरपंच डवर यांनीच तक्रारदार यांचे क्रशरवरील व्यवस्थापक यांची भेट घेवुन क्रशर व्यवसाय चालु ठेवायचा असेलेस व नोटीसा मागे घ्यायचे असल्यास स्वत: ७५,०००/- व प्रांताधिकारी प्रधान साहेब यांचेसाठी ५ लाख रूपये द्यावे लागतील असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांनी प्रांताधिकारी प्रधान, राधानगरी-कागल उपविभाग व फराळे गावचे सरपंच डवर यांचे लाच मागणीबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडे तक्रारी अर्ज दिला होता.

काल दि. ०८/०१/२०२२ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे सरपंच डवर यांचे लाचेची मागणीची पडताळणी केली असता, सरपंच डवर यांनी तक्रारदार यांचा व्यवसाय बंद करणेबाबत ग्रामपंचायत फराळे व राधानगरी-कागल उपविभागीय कार्यालय, कोल्हापूर यांनी दिलेल्या नोटीसी मागे घेण्यासाठी स्वत: साठी १ लाख रूपये व प्रांताधिकारी प्रधान यांचेसाठी १० लाख रूपयांची मागणी करून आज दि. ०९/०१/२०२२ रोजी लाच रक्कम देण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे आजरोजी प्रांताधिकारी प्रधान यांचे विण्डगेटस् अपार्टमेंट, न्यु पॅलेसजवळ येथील निवास्थानामध्ये त्यांचे लाच मागणीची पडताळणी केली असता, त्यांनी सरपंच डवर यांचे १० लाख रूपये लाच मागणीस दुजोरा देवुन ती लाच रक्कम सरपंच डवर यांचेकडे देण्यास सांगितले. सदरची लाच रक्कम देण्यासाठी सरपंच डवर यांनी तक्रारदार यांना मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील राधानगरी-कागल उपविभागीय कार्यालयाजवळ बोलविले.

त्याप्रमाणे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे परिसरात सापळा कारवाईचे आयोजन केले असता, कार्यालयाचे आवारात सरपंच डवर यांनी स्वत:चे चारचाकी गाडीमध्ये मागणी केले लाचेतील पहिला हफ्ता म्हणुन स्वत: साठी ५०,०००/- रू. व प्रांताधिकारी प्रधान यांचेसाठी ५ लाख रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक प्रसेनजीत बबनराव प्रधान, वय ४०, प्रांताधिकारी, सध्या नेम. राधानगरी-कागल उपविभागीय कार्यालय, कोल्हापूर, सध्या रा. फ्लॅट नं. ३०३, सी विंग, विण्डगेटस् अपार्टमेंट, न्यु पॅलेसजवळ, कोल्हापूर, मुळ रा. घर नं. ४५०, मित्रनगर, नवघन कॉलेजरोड, बीड शहर, ता. जि. बीड व संदीप जयवंत डवर, वय ४१, सरपंच - फराळे ग्रामपंचायत, ता. राधानगरी, रा. लिंगाचीवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुहास नाडगोडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार व मा. श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, श्री. नितीन कुंभार, पोलीस निरीक्षक, पोहेकॉ अजय चव्हाण, पोहेकॉ शरद पोरे, पोकॉ मयुर देसाई, पोकॉ रूपेश माने, सफौ. अमर भोसले, पोना विकास माने, पोना नवनाथ कदम, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.**

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,
४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
५)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,          ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner